प्रजावाणी दि. 14/08/2022.

# गाढवांची तस्करी करणाऱ्या टोळीचा ग्रामीण पोलिसांकडून पर्दाफाश

## सोळा गाढवांना केले मालकांच्या स्वाधीन



नवीन नांदेड (वार्ताहर), दि. १३ : परभणी जिल्हयातील पुर्णा येथील गाढवांची चोरी करुन तस्करी करणाऱ्या टोळीचा सिडको येथील ग्रामीण पोलिसांनी पाठलाग करुन गाडीतुन गाढवाची सुटका केली. यानंतर हे गाढव संबंधित मालकांच्या स्वाधीन केले. याबद्दल या मालकाने येथील पोलीस प्रशासनाचे आभार मानले आहे. असे असले तरी यातील एकही आरोपी पोलिसांच्या हाती लागला नाही, याबद्दल सर्वत्र आश्चर्य व्यक्त होत आहे.

परभणी जिल्ह्यातील पुर्णा येथून दि. १२ ऑगस्ट रोजी रात्री १.३० च्या सुमारास काही जण बोलोरो पीकअप गाडी क्रं. एपी ३९ युबी ०४२६ यातुन १६ गाढवांची तस्करी करून घेवून जात आहेत, अशी माहिती नांदेड पोलिसांना मिळाली. परंतु तोपर्यंत ती गाडी नांदेड शहर सोडुन उस्माननगर रस्त्यावर असल्याची माहिती पोलीस सहाय्यक निरीक्षक सुरेश थोरात यांच्या पथकाला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी या गाडीचा पाठलाग केला. उस्मानगर रस्त्यावर नाकाबंदीवर असलेल्या पोलीस उपनिरिक्षक आनंद बिच्चेवार यांनी गाडीला थांबविले. परंतु या गाडीतील आरोपींनी गाडी उभी होताच अंधाराचा फायदा घेवुन पळ काढला. त्यानंतर सिडको ग्रामीण पोलिसांनी त्या गाडीला पोलीस ठाण्यात आणले. गाडीत कोंबुन ठेवलेल्या गाढवांची सुटका करण्यात आली. यात एका गाढवाचा मृत्यु झाला. तर उर्वरित पंधरा गाढवाना चारा पाणी करुन पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला. यानंतर पोलिसांनी सर्व गाढव संबंधित मालकांच्या स्वाधीन केले.

या प्रकरणातील आरोपी ग्रामीण पोलिसांच्या हातात नसतानाही ग्रामीणचे पोलीस निरिक्षक अशोक घोरबांड यांनी फार मोठी कार्यवाई केल्याचा देखावा करत सर्वच समाज माध्यमावर आपली पाठ थोपटून घेण्याचे काम केले. पोलिसांनी या परिसरातील सर्वच अवैध धंदे बंद करावेत, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.